


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे अंक : ७८९. वा शनिवार दि. ०१ जून २०२४ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये




# येणाऱ्या गोष्टींचा हा फक्त ट्रेलर अखेरच्या टप्प्यातील मतदानाच्या आधी पंतप्रधान मोदींचे सूचक वक्तव्य...

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

देशाच्या चौथ्या तिमाहीतील विकासदर ८.२ टक्के नोंदवल्याचे भारतीय सांख्यिकी आयोगाने जाहीर केलेल्या आकडेवारीचे स्वागत करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. देशाच्या अर्थव्यवस्था वाढीत योगदान दिल्याबद्दल त्यानी भारतीयांचे आभार मानले आहेत.देशाच्या लोकसभा निवडणूका अंतिम टप्प्यात आल्या असताना जाहीर झालेल्या आकडेवारीवर पंतप्रधान मोदींनी शुक्रवारी या माध्यमावर याबाबत एक ट्वीट केले असून त्यामध्ये २०२३-२०२४ च्या चौथ्या तिमाहीतील विकास दर हा ८.२ टक्क्यांवर पोहोचल्याचे सांगत हा येणाऱ्या गोष्टींचा हा फक्त ट्रेलर आहे असे म्हणत याबाबत समाधान व्यक्त केले आहे.या ट्वीटमध्ये त्यांनी म्हटले आहे की,२०२३-२४ च्या चौथ्या तिमाहीतील जीडीपी वाढीची आकडेवारी आपल्या अर्थव्यवस्थेची मजबूत गती दर्शवतो जी आणखी वेगवान होत आहे. यासाठी आपल्या देशातील कष्टाळू लोकांचे आभार. २०२३-२४ या वर्षातील ८.२ टक्क्यांची वाढ हे भारतीय अर्थव्यवस्था ही जागतिक स्तरावर सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था असल्याचे उदाहरण देते. मी म्हटल्यानुसार, हा येणाऱ्या गोष्टींचा ट्रेलर आहे.पंतप्रधान मोदींच्या या ट्वीटला दुजोरा देत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारमन यांनी देखील ट्वीट करत देशाच्या हा वाढता विकासदर मोदींच्या तिर्सऱ्या कार्यकाळातही पहायला मिळेल असा विश्वास व्यक्त केला आहे.दरम्यान देशात सध्या अंतिम टप्प्यातील निवडणूका १ जूनला होत असून यामध्ये पंतप्रधान मोदी लढत असलेल्या उत्तरप्रदेशातील वाराणसी मतदारसंघाचाही समावेश आहे.निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर मोदी सध्या कन्याकुमारी येथील विवेकानंद रॉक मेमोरियल येथे गुरुवारपासून ध्यानसाधना करत आहेत. ४ जून रोजी देशातील लोकसभा निवडणूकांचे निकाल जाहीर



होतील.अखेरच्या टप्प्यासाठी मतदान होण्याच्या आधी उत्तर प्रदेशमधील मिर्जापूर येथे निवडणूक ड्यूटीवर असलेल्या १३ जणांचा मृत्यू झाल्याची बातमी समोर आली. मृत्यू झालेल्यांपैकी ७ होमगार्डचे जवान आहेत. तर अन्य ३० जणांवर रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. या सर्वांना तापमान वाढीचा त्रास झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले

## मोटर रिवायडिंगचे दुकान फोडून ९८ हजाराचा ऐवज लंपास

**जनसचंलन/ उदयनगर**



येथून जवळ असलेल्या पाळा फाट्यावरील अभय मोटार रिवायडींगचे दुकान अज्ञात चोरट्याने फोडून दुकानातील पाणबुडी मोटर व इतर साहित्य असा ९८ हजारांचा ऐवज लंपास केला. सदर घटना २९ मे रोजी सकाळच्या सुमारास उघडकीस आली. या प्रकरणी हिवरखेड पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल केलेला आहे. हिवरखेड पो. स्टे. अंतर्गत येत असलेल्या पाळा फाट्यावर बबन रामचंद्र लहाने यांच्या शेतात गट नंबर ५६ मध्ये असलेले अभय मोटार रिवायडींगचे दुकान आहे. २९ मे च्या सकाळी ७ वाजता दुकान उघडले असता दुकानाचे मागील टीन पत्रा वाकलेला दिसला. अज्ञात चोरट्याने रात्रीच्या सुमारास दुकानात प्रवेश करून दुकानातील जयराम सांगळे यांची ३ एचपी पाणबुडी मोटार, ज्ञानेश्वर सांगळे यांची ०३ एचपी पाणबुडी मोटार, नारायण आटोळे यांची ०३ एचपी पाणबुडी मोटर, कैलास सांगळे ०५ एचपी पाणबुडी मोटार अशा एकूण १६ लोकांच्या पाणबुडी मोटारी किंमत ८० हजार व दुकानातील एक जुना वापरता कुलर, ग्राइंडर ड्रिल मशीन, अपर्णा कंपनीचे कुलर व इतर इलेक्ट्रिकल साहित्य किंमत १८ हजार असा एकूण ९८ हजाराचा ऐवज लंपास केला, अशी फिर्याद भागवत आनंदा गावडेरा. पाळा ता. खामगाव यांनी हिवरखेड पोस्टेला दिली पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध अपराध क्रमांक ०१३२/२०२४ कलम ३८०, ४६१ भा. द. वि. नुसार दाखल केला असून पुढील तपास ठाणेदार कैलास चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली विठ्ठल चव्हाण करीत आहेत.

# भाडगणी शिवारात जुगार खेळताना आठ जणांना रंगहाथ पकडले

## ७ दुचाकी व एका कारसह ३ लाख ५७ हजारांचा मुद्देमाल जप्त

**जनसंचलन/मोताळा**

भाडगणी शिवारात जुगार खेळणाऱ्या आठ जणांना पोलिसांनी पकडले असून त्यांच्याकडून १२ हजार ३१० रुपयांसह ३ लाख ५७ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई ३० मे रोजी बोराखेडी पोलीसांनी केली. मलकापूर तालुक्यातील बोराखेडी पोलिस ठाण्याअंतर्गत येत असलेल्या भाडगणी शिवारातील शेतात जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती बोराखेडी पोलीसांना मिळाली होती. त्या माहितीच्या आधारावर ३० मे रोजी बोराखेडी ठाणेदार सारंग नवलकार यांच्या मार्गदर्शनात बोराखेडी पोलिसांचे पथक तयार करण्यात आले. त्यामध्ये सपोनि राजवंत आठवले, पोलिस हेडकॉन्स्टेबल नंदकिशोर धांडे, नायक पोलिस कॉन्स्टेबल विजय पैठणे, मंगेश पवार, पोलिस कॉन्स्टेबल



ताब्यात घेण्यात आलेले आरोपी व जप्त करण्यात आलेले साहित्य.

श्रीकांत चिंचोले, गणेश बरडे, आकाश यादव, गणेश सूर्यवंशी यांचा समावेश होता. या पथकाने ३० मे रोजी जुगार अड्डयावर छापा टाकला. पिंपळखुटा येथील कैलास सुखदेव उमाळे, शे. जेकब शे. रौफ, भास्कर काशीराम येवूल, सय्यद निजाम सय्यद उस्मान, शे. कलीम शे. अजीज, दाताळा येथील दिलीप मारोती बावस्कर, भाडगणी येथील गौतम रामधन राणे, उमाळी येथील बाबुसिंग गुलाबसिंग चव्हाण या आठ जणांना जुगार खेळतांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून १२ हजार ३१० रुपये नगदी, ७ दुचाक्या आणी एक चारचाकी वाहन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# चारधाम यात्रेसाठी जाणाऱ्या यात्रेकरूंनी नोंदणी करूनच जाण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

उत्तराखंडमध्ये चारधाम यात्रेसाठी यात्रेकरू मोठ्या प्रमाणावर जात आहेत. यात यात्रेकरूंची गैरसोय होणार असल्याने यात्रेकरूंनी नोंदणी करूनच जाण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. चारधाम यात्रा २०२४ च्या सुरुवातीच्या आठवड्यात उत्तराखंडमधील पवित्र चारधामला भेट देणाऱ्या यात्रेकरूंच्या संख्येत सतत वाढ होत आहे. त्यामुळे या यात्रेच्या उत्तम व्यवस्थापनासाठी दि. ३१ मे २०२४ पर्यंत सर्व व्हीआयपी दर्शन बंद करण्यात आले आहे. तसेच धाम येथील दर्शनाची प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी उत्तराखंड शासनाने चारधाम यात्रेसाठी नोंदणीची प्रक्रिया सुरू केली आहे. यात्रेकरूंसाठी नोंदणी अनिवार्य आहे. भाविकांनी चारधाम यात्रा २०२४ साठी registrationandtouristcare.uk.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. भक्तांनी ज्या तारखेसाठी नोंदणी केली असेल त्या तारखेलाच धाम येथे दर्शनाची परवानगी राहणार आहे. वृद्ध आणि आजारी असलेल्या यात्रेकरूंनी यात्रा सुरू करण्यापूर्वी स्वतः:ची वैद्यकीय तपासणी करावी. तसेच आरोग्य विभागाने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे. या सूचना health.uk.gov.in/pages/display/140-char-dham-yatra-health-advisory वर उपलब्ध आहेत. उत्तराखंड शासन भक्तांना कोणताही त्रास होणार नाही, यासाठी प्रयत्नशील आहे. त्यामुळे भाविकांनी सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# सामंजस्य करार केलेल्या उद्योजकांची सभा

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेत सामंजस्य करार केलेल्या उद्योजकांची सभा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचा उद्देश जिल्हास्तरावर गुंतवणूक आकर्षित करणे, जिल्हास्तरीय गुंतवणूकदार आणि व्यवसायांना एकत्र व्यासपीठ उपलब्ध करून देणे, जिल्ह्यांना विकासाचा केंद्रबिंदू म्हणून जिल्ह्याचा व राज्याच्या विकासाला चालना देणे, राज्याची अर्थव्यवस्था सन २०२७ पर्यंत एक ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविणे यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. जिल्हास्तरीय कार्यक्रमांमध्ये प्रमुख उद्योग क्षेत्राबाबत चर्चासत्र गुंतवणुकीच्या संधी इतर क्षमता असलेल्या क्षेत्रामधील गुंतवणूक व व्यवसाय संधी बाबत चर्चा झाली. सामंजस्य करारावेळी उद्योजकांनी अनुभव कथन केले. सामंजस्य करार केलेल्या उद्योजकांनी प्रस्तावित गुंतवणूक कालबद्ध पद्धतीने करण्याचे नियोजन केले आहे. उद्योग व्यवसाय संबंधित विभागांकडून आवश्यक परवानगी, नोंदणी, मंजुरी, आर्थिक प्रोत्साहन आदी विविध मुदतीत प्राप्त करण्यासाठी विद्यमान धोरण नियम आणि नियमानुसार देण्यात येणार आहे. यासाठी जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी प्रत्येक उद्योजकासमवेत चर्चा केली.



जामोद येथील समाधान दामधर यांनी जामोद येथे एकच व्हीकेजीबी बँक शाखा असून सीएमईजीपी योजनेत क्लस्टर मेंबर्सना इतर बँकांनी कर्ज पुरवठा करावा किंवा नवीन शाखा सुरू करावी, अशी मागणी केली. जामोद येथे मीनल गारमेंट क्लस्टर, सातपुडा स्पायसेस फेडरेशन आणि नागवेली मिल्क प्रोसेसिंग क्लस्टर या तीन क्लस्टरचे डीएसआर मंजूर करण्यात आले. त्यांना इमारत बांधकामासाठी लागणाऱ्या इंडस्ट्रियल ना-हरकतीसाठी टाऊन प्लॅनिंग कार्यालयाने सोमवारपर्यंत त्वरित निकाली काढण्याचे निर्देशित दिले. महेश स्टील, केलवद यांचा प्रस्ताव बँकेत दाखल झाला असल्याचे सांगितले. नारायण सिनकर यांच्या बालाजी इंडस्ट्रीला अखंडित वीज पुरवठा करण्याचे निर्देश वीज कंपनीला दिले. बुलढाणा ऑइल क्लस्टर आणि मातृत्व डेरी क्लस्टर, चिखली यांचे डीएसआर मंजूर आहे. क्लस्टर मेंबरची सीएमईजीपी योजनेत कर्ज प्रकरणे तयार करण्याचे निर्देश देण्यात आले. श्याम कुटीर गारमेंट क्लस्टर, चिखलीचे बांधकाम सुरु होणार असल्याचे सांगितले. मोताळा येथे २५ मेगावॅटचे सोलर पॅनलमार्फत वीज उत्पादन सुरू झाले आहे. तसेच सोनाळा, चिखली, मेहकर, खामगाव येथे वीज उत्पादन सुरू करण्यात येणार आहे. बुरड ॲग्रो फुड इंडियाचे कर्ज प्रस्ताव गतीने मंजूर करण्याची निर्देश देण्यात आले. सोनाळा येथील अभिता ॲग्रो इंडस्ट्रीजला आधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध करून देण्याच्या सूचना केल्या. तसेच उत्पादने मोठी बाजारपेठ आणि ऑनलाईन विक्रीसाठी ठेवण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केल्या.

# साहेब गरज नसलेल्या भक्ति महामार्ग करून आम्हाला भूमी हिन करू नका

## शेतकऱ्याची जिल्हाधिकारी साहेब यांना विनंती

**जनसंचलन/बुलढाणा**

साहेब गरज नसलेल्या भक्ति महामार्ग करून आम्हाला भूमी हिन करू नका शेतकऱ्याची जिल्हाधिकारी साहेब यांना अर्थाहक बुलढाणा एकनाथ माळेकर बुलढाणा जिल्ह्यातील भक्ती महामार्ग शासनाने होऊ घातलेला आहे त्यामध्ये समृद्धी महामार्ग ते शेगाव या रोडमध्ये १०९ गावची शेकडो ऐकर जमीन शासन शासनाच्या भावने अधिग्रहण करून शेतकऱ्यांना भुमिहीन करण्याचा डाव शासनाने आखला आहे त्याबाबत भक्ती महामार्ग कृती समितीने वेळोवेळी निवेदन देऊन व हरकती नोंदवून शासनाला विरोध दर्शवला आहे तरीसुद्धा शासनाने कोणत्याही प्रकारची दखल घेतली नसेल मुळे अखेर ३०मे रोजी जिल्हाधिकारी बुलढाणा येथे उपोषण करण्याचे ठरले होते परंतु आचारसंहितेमुळे जिल्हाधिकारी साहेबांनी सदर उपोषण पुढे ढकलण्यात यावे अशी माहिती दिली असता सदर निवेदन हे पुढे ढकलण्यात आले आहे परंतु आज दिनांक ३० मे २०२४ रोजी भक्ती महामार्ग कृती समितीच्या सदस्यांनी माननीय जिल्हाधिकारी साहेब यांना भक्ती महामार्ग होऊ नये म्हणून एक निवेदन दिले आहे त्यामध्ये शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी साहेब यांना एक अर्थहाक दिले आहे की साहेब हा गरज नसलेला भक्ति महामार्ग करून शेतकऱ्याच्या जमिनी अधिग्रहण करू नका आम्हाला देशोधडीला लावू नका शेगावला जाण्यासाठी पर्याय चार रस्ते असताना सुद्धा भक्ती महामार्गाची गरज नसताना सुद्धा भक्ती महामार्ग होऊ घातलेला आहे त्याला आम्हा शेतकऱ्यांचा पूर्णतः विरोध आहे लोकसभेच्या निवडणुकीमध्ये गावागावांमध्ये शेतकऱ्यांनी लोकप्रतिनिधींना गावात येऊ न देण्याचे बॅनर सुद्धा झळकवले होते ३० मे रोजी शांततेत उपोषण होणार होते परंतु जिल्हाधिकारी साहेब यांनी कायद्याचा भंग होऊ नये म्हणून सदर उपोषण हे पुढे ढकलण्यात आले आहे यापूर्वी सुद्धा ७/३/ २०२४ रोजी हजारो शेतकऱ्यांच्या प्रतिनिधी यांनी माननीय जिल्हाधिकारी साहेब यांची भेट घेतली होती परंतु नंतर आचारसंहिता लागू असल्यामुळे त्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही तरी माननीय जिल्हाधिकारी साहेब यांच्यामार्फत शासनाला विनंती आहे की गरज नसलेला भक्ति महामार्ग करून नाही आणि शेतकऱ्यांना देशोधडीला लावू नाही अशी मागणी भक्ती महामार्ग कृती विरोधी समितीची सदस्यांनी जिल्हाधिकारी साहेब यांच्याकडे केली आहे सदर निवेदन देतेवेळी समाधान मस्के दासा पाटील वाघ सर गजानन चांदेले एकनाथ माळेकर विनायक सरनाईक डॉक्टर सत्येंद्र भुसारी मस्के पत्रकार अंढेरा व इतर शेतकरी निवेदन देते वेळेस जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथे हजर होते

# नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण

## प्रकल्पातून ५० हजार शेतकरी, १०० कंपन्या गटांना २१७ कोटी अनुदान

**जनसंचलन/बुलढाणा**

शेतकऱ्यांना संजीवनी देणारा नानाजी देशमुख कृषी संजीवन प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आला आहे. या प्रकल्पातून ४९ हजार ९२५ शेतकरी, १०४ शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी गटांना २१७ कोटी १० लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प राज्य शासनाचा महत्वाकांक्षी प्रकल्प जून २०१८ पासून जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे. या प्रकल्पातून शेतकऱ्यांना बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यास सक्षम करणे आणि शेती व्यवसाय किफायतशीर करण्याचे प्रमुख कामे करण्यात आली. सदर प्रकल्प जिल्ह्यातील ४१० गावांमध्ये राबविण्यात आला. प्रकल्पाची मुदत ३० जून २०२४ रोजी समाप्त होत आहे. प्रकल्पातील सिंचन प्रकल्पामुळे २१ हजार ८२८ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे. तसेच १९ हजार ३५२ शेतकऱ्यांना नवीन रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. कृषी औजारांमुळे ३ लाख ९ हजार ८०० हेक्टर क्षेत्र कृषी यांत्रिकीकरणाखाली आले आहे.



प्रकल्पातून १०४ शेतकरी बचत गट, शेतकरी उत्पादक कंपन्यांना विविध कृषी व्यवसायासाठी अनुदान देण्यात आले आहे. यात कृषी औजारे बँक, गोदाम, स्वच्छता व प्रतवारी केंद्र, प्रक्रिया युनिट, लाकडी तेल घाणे आदी कृषी व्यवसायांचा समावेश आहे. कृषी व्यवसायामुळे जिल्ह्यामध्ये ६ हजार ७१० मेट्रीक टन क्षमतेची साठवणूक सुविधा निर्माण झाली आहे.प्रकल्पामधून ४७० मृद व जलसंधारण कामे पूर्ण झाली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ढाळीचे बांध, माती नाला बांध, सिमेंट नाला बांध, खोल सलग समतल चर, गॅबियन बंधारे, शेततळे इत्यादीचा समावेश आहे. प्रकल्पांतर्गत एकूण ७३६ हवामान अनुकूल तंत्रज्ञान शेतीशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये विविध हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्रसार करण्यात आला आहे. या तंत्रज्ञानाचा उपयोग शेतकऱ्यांना सध्याच्या बदलत्या हवामानात हवामान अनुकूल शेती करण्यासाठी होणार आहे. प्रकल्पाने शेतकऱ्यांना नवसंजीवनी देण्याचे काम केले आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बँकांच्या शाखांनी दरमहा एक कर्ज प्रकरण निकाली काढावे -जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

## रोजगार निर्मिती कार्यक्रम राबविण्यासाठी उपाययोजना



जनसंचलन/बुलडाणा

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. यातून गावपातळीवर उद्योग सुरू होऊन स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. त्यामुळे बँकांनी प्रत्येक शाखेमध्ये दर महिन्याला एक कर्ज प्रकरण मंजूर करून वाटप करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिल्या. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात जिल्ह्यास १ हजार ३०० लाभधारकांचे लक्षांक प्राप्त झाले आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी झालेला बैठकीला जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे, व्यवस्थापक सुनील पाटील यांच्यासह सर्व बँकांचे क्षत्रिय प्रबंधक, झोनल मॅनेजर जिल्हा समन्वयक उपस्थित होते. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत बँकांना दिलेले लक्षांक पूर्ण करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. यासाठी योजनेचे लक्षांक डिसेंबर पर्यंत पूर्ण करण्यासाठी नियोजन करावे. योजनेच्या सुरुवातीपासून पोर्टलवर प्रलंबित कर्ज प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यात यावा. सन २०२३-२४मध्ये पोर्टलवर प्राप्त प्रकरणे मंजूर करावीत. तसेच स्टेट बँकेने बुलढाणा आणि चिखली येथे फोरेक्स शाखा स्थापित करण्यासाठी कार्यवाही करावी. निर्यात वाढीसाठी जिल्ह्यातील निर्यातदार उद्योजकांना तात्काळ पतपुरवठा करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. सन २०२३-२४ या वर्षात ५१५ कर्ज प्रकरण मंजूर करण्यात आली आहेत. परंतू कर्ज वाटप झालेले नाहीत, अशा प्रकरणाचा त्वरीत निपटारा करावा. बँकांनी संभाव्य उद्योजकांची नावे जिल्हा उद्योग केंद्राकडे देऊन मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाच्या पोर्टलवर अर्ज भरून घ्यावेत. मार्च २०२४ मध्ये जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेमधील सामंजस्य करार केलेल्या उद्योजकांना राष्ट्रीयकृत बँकांनी मदत करण्याचे आवाहन केले. जिल्ह्यात प्रथमच क्लस्टर योजनेमध्ये पाच डीएसआर आणि एक डीपीआर मंजूर झाला आहे. अजून एक डीपीआर मंजुरीच्या प्रतीक्षेत असल्याने बँकांनी क्लस्टर सदस्यांना सीएमईजीपी योजनेत दिलेल्या लक्षांक व्यतिरिक्त विशेष बाब म्हणून कर्ज उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश दिले. सन २०२२-२३ वर्षात जिल्ह्यातून ७६८ कोटी रुपयांची निर्यात झाली. गेल्या वर्षी सन २०२३-२४मध्ये वाढ होऊन ८४१ कोटी रुपये निर्यात झाली. बँकांनी निर्यातीसाठी कर्ज पुरवठा करून यावर्षी १ हजार ५०० कोटी रुपयांच्या निर्यातीचे उद्दीष्ट ठेवण्याचे सांगितले. निर्यातदारांना सोयीचे व्हावे, यासाठी जिल्ह्यात विदेशी चलन हाताळणारी बँक शाखा त्वरित कार्यान्वित करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. स्टेट बँकेचे रिजनल मॅनेजर इकबाल यांनी बुलढाणा फॉरेक्सची शाखा सुरू करण्याबाबत त्वरित कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले. तसेच सामाजिक सुरक्षा विमा योजनेत सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांचे पीक कर्ज थकीत असल्यास त्याच्या पत्नीला कर्ज मंजुरीसाठी अडचण येऊ नये, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी दिल्या. शेतकरी बी-बियाणे खत खरेदीसाठी कृषी सेवा केंद्रावर जात असल्याने बँकांनी याठिकाणी योजनांचे फलक लावावेत. कर्ज घेतल्यावर तीन टक्के केंद्र शासन, तीन टक्के राज्य शासन, असे एकूण सहा टक्के व्याज अनुदानाचा लाभ शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावा. पीक कर्ज नियमित भरणाऱ्या शेतकरी कुटुंबातील मुलांना सीएमईजीपी योजनेचा लाभ मंजूर करण्यात यावा, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी दिल्या

# खरीप हंगाम पूर्व नियोजन मार्गदर्शन सभा संपन्न

जनसंचलन/ चिखली




चिखली तालुक्याचे तालुका कृषी अधिकारी श्री डि. बि. सवडतकर साहेब व मंडळ कृषि अधिकारी श्री . जी बी . सोरटे यांचे मार्गदर्शनाखाली कानिफनाथ नगरी कवठळ येथे खरीप २०२४ हंगाम पूर्व नियोजन तथा हुमणी अळी नियंत्रण मार्गदर्शन सभा पार पडली. सभेला मार्गदर्शक म्हणून कृषी विज्ञान केंद्र बुलढाणा येथील शास्त्रज्ञ श्री .डॉ.अनिल तारू सर व श्री .प्रवीण देशपांडे सर उपस्थित होते. मार्गदर्शकांनी सोयाबीन या मुख्य पिकासह तुर,कापूस,उडीद,मूग या पिकांच्या वाण व बियाणे निवडीपासून ते काढणीपर्यंत चे सखोल मार्गदर्शन उपस्थितांनी केले , त्यामध्ये वाणाची निवड करणे, बियाणे उगवण क्षमता तपासणी करणे, बियाण्याला रासायनिक व जैविक बीज प्रक्रिया करणे तथा बीज प्रक्रियेचे फायदे, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पेरणी करणे, त्यामध्ये बी बी एफ, टोकन यंत्र, सरीवरंबा आणि बेडवर लागवड , पट्टा पद्धत इत्यादी ,खते व्यवस्थापनामध्ये रासायनिक खताचे वापराचे प्रमाणासोबतच पुर्ण कुजलेल्या शेण खताचा सुद्धा ट्रायकोडर्मा सोबत शेतीमध्ये उपयोग करणे, व तणनाशकाचा पेरणी पूर्व पेरणी नंतर उगवणी पूर्ण उगवणी पश्चात वापर करून तण नियंत्रण व गरजेनुसारच बुरशीनाशकाचा वापर करणे पाणी व्यवस्थापन, सोयाबीन या मुख्य पिकावरील कीड व रोग निरीक्षण आणि उपाययोजना करणे, योग्य वेळी योग्य विद्राव्य खते फवारणी मधून पिकाला देणे, हुमणी अळी नियंत्रणासाठी शेताच्या बांधावरील लिंबाचे झाडाची छाटणी करणे, रात्रीच्या वेळेस लाईट ट्रॅप लावणे, मेटारिजियम ऍनिसोपेली या जैविक कीटनाशकाचा जमिनीमधून वापर करणे इत्यादी. यावेळी कृषी विभागाच्या योजनांची माहिती सुद्धा शेतकऱ्यांना देण्यात आली, सभेला कृषी पर्यवेक्षक आर. ए. परिहार, कृषी सहाय्यक पाटील, दंदाले, किंगरे साहेब तथा खेडकर ,सोनुने, ठेंग, मॅडम उपस्थित होत्या उपस्थितांमध्ये सरपंच श्रीराम गावंडे यांच्यासह गावातील शेतकरी वर्ग उपस्थित होता, मार्गदर्शन सभेचा चंदनपुर च्या सरपंचासह काही शेतकऱ्यांनी सुद्धा लाभ घेतला.

# ९ जून ला सर्व जातीय सामूहिक विवाह सोहळा व बहुजन रत्न पुरस्कार सोहळा

जनसंचलन/चिखली

ऋणानुबंध समाज विकास संस्था, चिखली व तुकाराम आश्रय वृद्धाश्रम, सुलोचना माहेर घर (महिला आश्रम) लताई अनाथालंय भोकर ता चिखली जिल्हा बुलडाणा र. नं. ५३४ ११०५८/०९ यांच्या वतीने विश्वरत्न विश्व शांती दूत तथागत भगवान बुद्ध जयंती व अहिल्याबाई होळकर जयंती निमित्त लोकप्रतिनिधी, राजकीय नेते सामाजिक नेते जेष्ठ पत्रकार समाजसेवक यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये सर्व जातीय सामूहिक विवाह सोहळा, बहुजन रत्न पुरस्कार सोहळा व फुले शाहू आंबेडकरी विचारावर व्याख्यान या कार्यक्रम चे आयोजन करण्यात आले आहे. सर्व जातीय सामूहिक विवाह सोहळ्यात सहभागी होऊन विवाहबद्ध होणाऱ्या जोडप्यातील वधू पित्यास महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागाच्या कन्यादान योजने अंतर्गत २०,०००/- रुपये अनुदान देण्यात येणार आहे. विवाह सोहळ्यात सहभागी होण्यासाठी ८८५५८५०३७८ या नंबरवर संपर्क करावे. तसेच फुले शाहू आंबेडकरी विचार धारेला तेवत ठेवण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची करून जनसामान्य लोकांना न्याय देण्यासाठी अविरत संघर्ष करणाऱ्या राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील एका व्यक्ती ला फुले शाहू आंबेडकर यांचे वैचारिक वारसदार बहुजन नायक मान्यवर कांशीराम जी यांच्या स्मृती प्रित्यर्थ बहुजन रत्न जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच



ह. भ. प. धर्मकीर्ती महाराज परभणीकर यांचा फुले शाहू आंबेडकरी विचारावर व्याख्यानचे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच कार्यक्रम समाप्ती नंतर भोजनदान चे सुद्धा आयोजन आहे. तरी वरील कार्यक्रम चा आस्वाद घेण्यासाठी दि. ९ जून २०२४ ला रोज रवीवार ला पंचशील बुद्ध , गजानन नगर चिखली ता. चिखली जिल्हा बुलडाणा येथे. जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी

# दुकानातून २६ हजाराचा मोबाईल चोरट्याने केला लंपास

जनसंचलन/ शेगाव



येथील खेतान चौकातून अज्ञात इसमाने मोबाईल लंपास केल्याची घटना घडली.याबाबत नीतीन बद्रीप्रसाद अवस्थी वय ४२ वर्ष यांनी पोलिसात फिर्याद दिली की, एक अनोळखी इसम दुकानात आला व त्याने त्याचे जवळचे कागदपत्र मला दाखवले व मला काही पैशाची मदत करा असे मला म्हणाला त्यावेळी तो मला कागदपत्र दाखवत असतांना माझा सॅमसंग कंपनीच ए ३३ आकाशी रंगाचा मोबाईल ज्यामध्ये बीएसएनएल कंपनीचे सीम व जीओ कंपनीचे सीम ज्याचा ायएमईआय३५०९९५४१५८४८३०५ असलेला माझा मोबाईल की अं २५, ९९९/- माझ्या दुकानाचे काउंटर वर ठेवलेला होता. सदर अनोळखी इसम कागदपत्र दाखवुन भीक मागुन दुकानातुन निघून गेल्यानंतर मी माझे दुकानाचे काउंटर वर ठेवलेला माझा मोबाइल दिसून आला नाही. तरी माझे दुकानात पैसे मागण्याकरीता आलेल्या अनोळखी इसमाने माझा वर नमुद वर्णनाचा मोबाइल चोरुन नेला आहे अशा फिर्यादी चे तोंडी रिपोर्ट वरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# इंडिया आघाडीतील सर्वमान्य चेहरा राहुल गांधी नव्हे, पंतप्रधानपदासाठी दुसऱ्याच नेत्यास पसंती...

वृत्तसंस्था/ नवी दिल्ली

नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधानपदाच्या तिसऱ्या शपथविधीसाठी भाजपकडून जोरदार वातावरणनिर्मिती केली जात असतानाच, सातव्या टप्प्याअखेरीस इंडिया मध्येही बहुमताच्या आकड्यापर्यंत पोहोचण्याचा जबरदस्त विश्वास निर्माण झाला आहे. निवडणुकीचे निकाल लागल्यानंतरच्या परिस्थितीत इंडियाचे नेतृत्व करण्यासाठी सर्वमान्य चेहरा म्हणून काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्याकडेच पाहिले जात आहे. अशक्यतेची कला (आर्ट ऑफ द इम्पॉसिबल) असे सांगितले जाणाऱ्या राजकारणाच्या महासागरात निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात आरोप-प्रत्यारोपांच्या उंचउंच लाटांचे नर्तन सुरू आहे. निवडणुकीनंतर खर्गे यांची काँग्रेस अध्यक्षपदाची नोकरी जाणार, अशी टीका प्रचारादरम्यान करण्यात आली होती. प्रत्यक्षात निवडणुकीचा अध्याय अखेरच्या टप्प्यात आलेला असताना डावे पक्ष व काँग्रेससह इंडियाच्या साऱ्या नेत्यांमध्ये सत्तावापसीचा विश्वास व्यक्त होत आहे. तसे झाले नाही तरी निवडणुकीनंतर इंडियाचे नेतृत्व अनुभवी खर्गे यांच्याकडे जाणार याबाबतही राजकीय जाणकारांना शंका नाही.निवडणूक प्रचाराच्या ७७ दिवसांत काँग्रेसने मोदी व भाजप नेत्यांविरुद्ध निवडणूक आयोगाकडे ११७ तक्रारी केल्या. मात्र, त्यावर कोणतीही कारवाई झाली नाही. काँग्रेसने गेल्या ७२ दिवसांत नरेंद्र मोदींना २७२ प्रश्न विचारले होते; पण आम्हाला एकही उत्तर मिळाले नाही, असे काँग्रेसने म्हटले आहे.इतिहासात देशाला अनेकदा क्रांतीचा नवमार्ग दाखवणाऱ्या महाराष्ट्रासह कर्नाटक व बिहार या तीनच राज्यांत भाजपच्या जागा सध्याच्या अंदाजानुसार कमी झाल्या तरी जाणकारांच्या मते मोदींच्या नेतृत्वाखाली भाजपला तिसऱ्यांदा २७२चा जादुई आकडा गाठता येण्याची शक्यता अंधुक आहे. त्यामुळेच इंडियाचे नेतृत्व; तसेच संभाव्य पंतप्रधानपदाचा सर्वमान्य चेहरा म्हणून खर्गे यांच्या नावाचाच पर्याय पुढे आला आहे. आघाडीला बहुमत मिळाले तरी राहुल गांधी पंतप्रधानपदाची जबाबदारी घेणार नाहीत, असे काँग्रेसचे नेते आताच ठामपणे सांगत आहेत. काँग्रेसला सर्वाधिक जागा मिळाल्यास पंतप्रधानपदावर त्याच पक्षाचा नैसर्गिक दावा असेल. या स्थितीत इंडियातील तमाम नेत्यांना मान्य होईल असे खर्गे यांचेच नाव आहे.



# समृद्धीवर पुन्हा लूटमार चार तोळे सोने लुटले एकावर चाकू हल्ला

जनसंचलन/मेहकर

समृद्धी महामार्गावर पुन्हा एका कारचालकास लुटून १ लाख ४५ हजार रुपयाचा मुद्देमाल लंपास करण्यात आला. ही घटना ३१ मे रोजी पहाटे डोणगावनजीक घडली. या घटनेत नागपूर येथे जात असलेल्या पुण्यातील व्यावसायिकास चाकू मारून गंभीर जखमी करण्यात आले. सोबतच रोख रकमेसह एक आयफोन असा १ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल लुटण्यात आला. दरम्यान, १० मे रोजी झालेल्या लूटमारीच्या घटनेनंतर पुन्हा २० दिवसांनी येथे ही लूटमारीची घटना घडली आहे. त्यामुळे समृद्धी महामार्गावर प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. डोणगाव येथून समृद्धी महामार्ग जातो. ज्यावर नागपूरकडे जाणाऱ्या मार्गावर व मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावर दोन्ही कडेला पेट्रोलपंप असून, विश्रांती नाका आहे. या ठिकाणी थोड्या वेळ विश्रांतीसाठी वाहने उभी राहतात. मात्र मागील काही दिवसांपासून या ठिकाणी लूटमारीच्या घटना घडत असून, पोलिसांनाही त्यांना



पकडणे अद्याप शक्य झालेले नाही. दरम्यान पुणे येथील रमेश सुरेश पटेल व दीपेश गंगाराम उकाणी हे व्यावसायिक कारने (एमएच-१४-केएल-१८००) नागपूरला जात होते. येथील लोणी गवळीच्या पुलापासून काही अंतरावर विश्रांती नाक्यावर काही काळासाठी ते थांबले होते. दरम्यान पहाटे साडेतीन वाजेच्या सुमारास तीन अज्ञात व्यक्तींनी कारच्या काचा फोडल्या. चाकूच्या धाक दाखवून दोघांकडेही पैसे मागितले. रमेश पटेल यांनी प्रतिकार केला असता त्यांना चाकू मारून गंभीर जखमी केले. यावेळी त्यांच्याजवळील चार तोळे सोन्याची चेन व एक आयफोन असा ऐवज घेऊन चोरट्यांनी पलायन केले.

# वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा सुरळीत करा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महावितरण अभियंता यांना निवेदन

जनसंचलन/ देऊळगावराजा

देऊळगावराजा शहरात वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. कधी वीज जाईल आणि कधी येईल, याचा भरोसा राहिला नाही. दिवसा व रात्रीही अचानक विजेचा लपंडाव सुरू असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे तालुकाध्यक्ष राजेश इंगळे यांनी महावितरणचे उपकार्यकारी अभियंता यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने शहरात अचानक खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याने नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. विजेची झालेली दरवाढ आणि वेळेवर वीज बिल भरूनही नागरिकांना व व्यापाऱ्यांना योग्य सेवा मिळत नाही. परिणामी, इन्व्हर्टर, जनरेटरचा आधार घ्यावा लागत असल्याने नाहक खर्च वाढत आहे. यावर्षी कडाक्याचा उन्हाळा असल्याने नागरिकांच्या अंगाची महाराष्ट्र राज्याचे शास्त्रज्ञ लाहीलाही होत आहे. त्यात अचानक वीजपुरवठा



खंडित झाला की लहान मुलांपासून ते वृद्धांचा जीव कासावीस होत आहे. तसेच सध्या लग्नसराईचा हंगाम असल्याने बाजारपेठेत लगबग आहे. वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने व्यापारावरही त्याचा परिणाम होत आहे. शहरात तांत्रिक बिघाडाच्या घटना वारंवार होत असल्याने वीज खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. महावितरणचे कर्मचारी व अधिकारी याकडे दुर्लक्ष करत असल्याने शहरातील नागरिकांमध्ये महावितरण विरोधात प्रचंड रोष आहे. त्यामुळे वीजपुरवठा खंडित होण्याच्या प्रकारावर कायमस्वरूपी तोडगा काढून शहरात वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष राजेश इंगळे, तालुका सचिव जहीर पठाण, शहराध्यक्ष विजय खांडेभराड, अमजत खान, शंकर वाघमारे, जना मगर, सचिन कोल्हे, असलम खान आदींनी केली आहे. मध्यंतरी झालेल्या अवकाळी पावसामुळेही तालुक्यातील काही भागातील वीज पुरवठा खंडीत झाला होता.